# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा, तीन ऑक्टोबर 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- पंतप्रधान उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर, केंद्र आणि राज्याच्या किसान सन्मान निधीचा पुढचा हप्ता होणार वितरीत
- पंतप्रधान आंतरवासिता योजनेला सुरुवात, येत्या पाच वर्षात एक कोटी युवकांना अग्रणी कंपन्यांमधे मिळणार प्रशिक्षणाची संधी
- शारदीय नवरात्रोत्सवाचा राज्यात उत्साह

आणि

- महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत-न्यूझीलंड सामना

****

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. तीन ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलं.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या निर्णयाचं साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केलं आहे. मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी या निर्णयाचं स्वागत करत, या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी केली. ते म्हणाले...

***“उशीरा का होईना मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला, त्याबद्दल भारत सरकारच्या मंत्रिमंडळाचे मी अभिनंदनही करतो आणि आभारही मानतो. हा निर्णय घेतल्यानंतर त्याच्या तत्काळ कार्यवाहीची मराठी समाजाला, महाराष्ट्राला अपेक्षा आहे. तशी कार्यवाही तातडीने व्हावी, अशा प्रकारची मागणी महाराष्ट्रातल्या मराठी समाजाच्या वतीने मी करतो.”***

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळं भाषेच्या समृद्धीसाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले जातात. यात केंद्र सरकारकडून दरवर्षी २५० ते ३०० कोटी रुपये अनुदान मिळते. तसंच देशभरातील विद्यापीठांमध्ये मराठी भाषेसाठी विशेष केंद्र उभारुन, मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था केली जाते.

दरम्यान, राष्ट्रीय खाद्य तेल मिशनला मान्यता, शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी पीएम राष्ट्रीय कृषी विकास योजनेला मंजुरी, रेल्वे कर्मचाऱ्यांना दोन हजार २९ कोटी रुपये बोनस, आदी निर्णयांनाही काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पाच ऑक्टोबरला राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. वाशिम इथं होणाऱ्या एका कार्यक्रमात पी.एम. किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांचे ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतले अनुक्रमे १८ वा आणि पाचवा हप्ता मोदी यांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी ही महिती दिली.

****

पंतप्रधान आंतरवासिता योजनेला काल प्रायोगिक तत्वावर प्रारंभ झाला. या पथदर्शी प्रकल्पासाठी सरकारने ८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी पीएम इन्टर्नशीप डॉट एम सी ए डॉट जी ओ व्ही डॉट इन, या पोर्टलवर येत्या १२ ते २५ ऑक्टोबर दरम्यान अर्ज करायचे आहेत. २१ ते २४ वर्ष वयोगटातल्या आणि पूर्णवेळ नोकरी किंवा पूर्णवेळ शिक्षण न घेणाऱ्यांना योजनेसाठी अर्ज करता येईल. पात्र लाभार्थ्यांना केंद्र सरकारकडून दरमहा साडेचार हजार रुपये तर नियोक्ता कंपनीकडून दरमहा ५०० रुपये मिळतील. येत्या पाच वर्षात देशातल्या एक कोटी युवकांना ५०० अग्रेसर कंपन्यांमधे आंतरवासिता प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणं हे या योजनेचं उद्दिष्ट आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मुंबई महानगरपालिकेने दादर इथं शिवाजी पार्क मैदानावर येत्या १२ तारखेला दसरा मेळावा घेण्यास परवानगी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेचा दसरा मेळावा वांद्रे कुर्ला संकुलावर होणार आहे.

****

शारदीय नवरात्रोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. राज्यात आदिशक्तीच्या साडे तीन शक्तीपीठांसह देवीच्या सर्वच मंदिरांमध्ये पारंपरिक पद्धतीनं घटस्थापना करण्यात आली. राज्यातल्या महत्त्वाच्या देवी मंदिरांतल्या घटस्थापनेचा आढावा घेणारा हा वृत्तांत…

***"नांदेड जिल्ह्यात माहूर इथं रेणुका देवीच्या नवरात्रोत्सवाला आज घटस्थापनेनं प्रारंभ झाला. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह शेकडो लोकांनी काल पहिल्या माळेला रेणुकामातेचं दर्शन घेतलं. नवरात्रोत्सव कालावधीत भाविकांच्या वाहतुक सेवेसाठी एसटीच्या ११० बस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, तसंच याठिकाणी तीन आरोग्य पथकंही नियुक्त करण्यात आली आहेत''***

**

***"धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथल्या तुळजाभवानी मातेच्या मंदिरात मंदिर समितीचे अध्यक्ष तथा धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते सपत्नीक विधिवत घटस्थापना करण्यात आली. त्यापूर्वी घटाची कल्लोळतीर्थापासून मिरवणूक करण्यात आली. यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नऊ दिवस चालणाऱ्या या शारदीय नवरात्र महोत्सवात तुळजाभवानी देवीच्या विविध अलंकार महापूजा मांडण्यात येतात.''***

**

***"कोल्हापूर इथं करवीर निवासिनी अंबाबाई देवीची काल श्रीसूक्तवर्णित श्रीमहालक्ष्मी रुपात पूजा बांधण्यात आली. मंदिरात सकाळी अभिषेक पूजा झाल्यानंतर घटस्थापना होताच तोफेची सलामी देण्यात आली.''***

**

*“नाशिक जिल्ह्यात वणी इथं सप्तशृंगी देवीची प्रधान आणि जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. त्यापूर्वी देवीच्या अलंकाराची भव्य मिरवणूक काढण्यात आली. घटस्थापनेनंतर देवीच्या दर्शनासाठी भाचिकांनी गडावर मोठी गर्दी केली होती.”*

**

*“अंबाजोगाई इथं श्री योगेश्वरी देवीच्या वर्णी पूजेनंतर घटस्थापनेनं नवरात्राला प्रारंभ झाला. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज सकाळी सपत्निक महापूजा केली. १२ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या उत्सवात दररोज भजन, कीर्तन, प्रवचन, आदी उपक्रम राबवले जाणार आहेत.”*

**

*“खान्देश कुलस्वामिनी असलेल्या धुळ्याच्या एकविरा देवीची नवरात्राच्या पहिल्या दिवशी खासदार डॉ. शोभा दिनेश बच्छाव यांच्या हस्ते पूजा आरती करण्यात आली, भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे.”*

**

*“अहमदनगर जिल्ह्यात मोहोटा देवीसह जिल्हाभरातल्या विविध ३६ स्थळांवर भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्याचं दिसून येत आहे.”*

**

*“छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा परिसरात तुळजाभवनी मंदीरात विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते तथा मंदिराचे मुख्य पुजारी अंबादास दानवे यांच्या हस्ते आज घटस्थापनेनंतर आरती करण्यात आली. शहर परिसरातून शेकडोच्या संख्येनं भाविक पहाटेपासूनच देवीच्या दर्शनासाठी गर्दी करत असल्याचं दिसून येत आहे.”*

****

हिंगोली इथल्या १७० वर्षाची परंपरा असलेला दसरा मेळाव्याला काल सुरुवात झाली. सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने यानिमित्तानं भरवण्यात आलेल्या औद्योगिक आणि कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते झालं. या दसरा मेळाव्यात विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमाबरोबरच विविध क्रीडा स्पर्धांचंही आयोजन करण्यात आलं आहे.

****

क्रिकेट

महिलांच्या आयसीसी टी–ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत आज भारताचा सामना न्यूझीलंडसोबत होणार आहे. दुबई इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरु होईल. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज दरम्यान देखील आज सामना होणार आहे.

दरम्यान, शारजा इथं काल या स्पर्धेला सुरुवात झाली. सलामीच्या सामन्यात बांग्लादेशनं स्कॉटलंडचा १६ धावांनी, तर अन्य एका सामन्यात पाकिस्ताननं श्रीलंकेचा ३१ धावांनी पराभव केला.

****

राज्य सरकारनं २०२२–२३ या वर्षासाठीचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार बॅडमिंडनपटू आणि प्रशिक्षक प्रदीप गंधे यांना जाहीर केला आहे. उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक आणि जिजामाता पुरस्कार क्रिकेटसाठी दिनेश लाडे, पॅरा शूटींगसाठी सुमा शिरुर, दिव्यांगांच्या ॲक्वेटीक्सकरता राजाराम घाग, धनुर्विद्येसाठी शुभांगी रोकडे, जिम्नॅस्टिकसाठी पवन भोईर आणि कबड्डीसाठी अनिल घाटे यांची निवड झाली आहे.

****